भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६७०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २७/०९/२०१७

**१) मोटार पंपची चोरी:—**

दिनांक २२/०९/२०१७ चे १४.३०० ते २५/०९/२०१७ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी रवीशंकर मुलचंद गलबले वय ३६ वर्ष, रा. देव्हाडा यांचे शेतालगत असलेल्या नाल्यावर लावलेली दिड एच पी.पी.सी. आर. जे कंपनीची विद्युत मोटार पंप कि. ३०,००/रु ची कोणीतरी अज्ञात चोराने कुनीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने, फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. डोंगरे पो.स्टे सिहोरा हे करीत आहेत.

**२) टाटा सुमोच्या धडकेत एक जखमी :—**

दिनांक २६/०९/२०१७ चे ०९.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी जखमी शैलेश सुरेश चंहादे वय ३० वर्ष, रा. परसोडी पो.स्टे खापरी हा शाळेचे व इतर कागदपत्र आणनेकरीता उमरेड वरून परसोडी येथ पल्सर मोटार सायकल क्र.एमएच ३१ सीपी. ३८४२ ने जात असता ,यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील टाटा सुमो भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला समोरून धडक मारून फिर्यादीला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने, फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा.कटारे पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

**३) क्षुल्लक कारणा वरून भांडण करून बासाच्या काठीने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २६/०९/२०१७ चे १६.०० वा. यातील फिर्यादी प्रकाश गोवर्धन सुदामे वय २१ वर्ष रा. कोरंभी हा व आरोपी यांची एकमेंका पासुन ३ वर्षा पासुन बोलाचाली बंद असुन दि. २५/०९/२०१७ ला फिर्यादी व आरोपी यांच्यात तोंडा तोंडी भांडण झाले असता, यातील आरोपीने जखमी फिर्यादीस म्हणाला की, तुम्ही काल कशाला शिवीगाळ केली, असे बोलुन बासाच्या काठीने फिर्यादीच्या डोक्यावर, दोन्ही खांदयावर व उजवे कानाचे वर मारून जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,५०४ भांदवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. सिबने पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**४) अचानक प्रकृती बिघडुन औषधोपचारा दरम्यान महीलेचा मृत्यु :—**

दिनांक ११/०९/२०१७ चे १३.४० वाजता दरम्यान यातील मृतक हिराबाई संतोष लारोकर वय ७५ वर्ष, रा. बजरंग वार्ड पवनी हीची अचानक प्रकृती बिघडल्याने, तिला मेडीकल कॉलेज नागपुर येथे औषधोपचारा करीता भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो.स्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र.००/१७ कलम १७४ जा.फौ. कागदपत्र जा.क्र. क्र. ५४१/१७ दि. २१/०९/२०१७ अन्वये टपाला द्वारे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. कन्नाके यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

**५) उपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु :—**

दिनांक १२/०९/२०१७ चे ०८.०० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. मंदा नत्थुजी मोदनकर वय ४३ वर्ष, रा. बजरंग वार्ड पवनी हीचे छातीत दुखत असल्याने, मृतकचे पतीने खाजगी दवखाना येथील डॉ. गभने पवनी यांनी तपासुन रेफर केल्याने पुठील उपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता, उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो. स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र जा.क्र. ५४२/१७ दिनांक २१/०९/१७ अन्वये टपालाने प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. कन्नाके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा मस्के पो.स्टे लाखांदुर हे करीत आहेत.

**६) अवैध दारू /जुगार अडयावर धाडी . :–**

दिनांक २६/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे.कारंधा,वरठी, तुमसर,आधंळगाव व साकोली येथे अवैध दारू/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०८ गुन्हे दाखल करून ५२लिटर हा.भ. दारू +६८० किलो सडवा मोहा किंमती ३७,२००/–रु,व १ लिटर ९८० मिली लिटर देशी दारू किंमती ५६० तसेच जुगारातुन किमती ३७,४३६/रु असा एकुण किंमती ७५,१९६/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता